# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ४३-२२** **दिनांक ०८/०२/२०२२**

## “ चारचाकी वाहनांची चोरी करणाऱ्या आरोपीतांस काशिमीरा पोलीसांकडुन अटक ”

दिनांक २९/०१/२०२२ रोजी दुपारी १३.०० वा. ते दिनांक ०४/०२/२०२२ रोजी दुपारी १४.०० वा.चे दरम्यान फिर्यादी नामे आबीद साबरी वय ३४ वर्षे, रा. हाटकेश उद्योगनगर, काशिमीरा, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे यांची बंद अवस्थेत असलेली होंडा सिव्हीक कार क्र. एम.एच-०४ ई.डी-५८७१ अंदाजीत २,५०,०००/- रुपये किंमतीची कार ही गौरव व्हॅली कॉम्प्लेक्सचे मेनगेट जवळ रोडवर उभी केलेली असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे संमती शिवाय लबाडीच्या इरादयाने चोरी केल्याबाबत काशीमीरा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक ७१/२०२२ कलम ३७९,४११,३४ अन्वये दिनांक ०६/०२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हेप्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि/प्रशांतगांगुर्डे व त्यांचे स्टाफने नमुद गुन्हयांचे घटनास्थळांपासुन ते आरोपीत पळुन गेलेल्या मार्गावरचे मुंबई शहरातील सुमारे ५० ते ६० सी.सी.टि.व्ही. फुटेजची बारकाईने पहाणी केली तसेच तांत्रीक विश्लेषन करुन त्याआधारे प्राप्त माहिती नुसार गुन्ह्यातील चोरी गेलेली कार ही टोव्हींग व्हॅनचे सहाय्याने मुंबईच्या दिशेने गेली असल्याचे निष्पन्न झाल्याने सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे सहाय्याने टोव्हींग व्हॅनचा क्रमांक एम.एच-०४ डी.टी.-४३८९ असा प्राप्त करुन नमुद टोव्हींग व्हॅनचा चालक आरोपीत नामे मैनुद्दीन अली वय ३५ वर्षे, रा. कुर्ला मुंबई यास ताब्यात घेवुन केलेल्या चौकशी मध्ये त्याने गुन्ह्यातील चोरीस गेलेली कार ही आरोपीत नामे राजा सिंग वय २६ वर्षे, रा. मिरारोड पुर्व याचेकडून घेवुन स्क्रॅप डिलर आरोपीत नामे ताहीर खान रा. कुर्ला मुंबई यास दिली असल्याचे सांगितले. आरोपीत ताहीर खान व मैनुद्दीन अली यांना पोलीस ठाणेत आणुन त्यांना वरील नमुद गुन्ह्यात दिनांक ०७/०२/२०२२ रोजी ०२.५० वा. अटक करण्यात आली आहे. तसेच गुन्ह्यातील मुख्य आरोपीत राजा सिंग, वय २६ वर्षे यास देखील दिनांक ०७/०२/२०२२ रोजी २२.४४ वा. सदर गुन्ह्यात अटक केली आहे. आरोपीत नामे ताहीर खान याचे निवेदन पंचनाम्यान्वये गुन्ह्यातील चोरीस गेलेल्या गाडीचे सुट्टे भाग हस्तगत करण्यात आलेले आहेत. तसेच आरोपीत नामे राजा सिंग याचे कडून मारुती व्हॅगनआर कार क्र. एम.एच-४७ एन-५१५४ व टाटा इंडीका कार क्र. एम.एच-०४ जे.डी.६५९४ ही हस्तगत करण्यात आलेली असुन ती कार आरोपीत याने कोठून चोरी केली आहे? याचा शोध घेत आहोत. सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

सदरची कामगीरी पोलीस उपआयुक्त परीमंडळ-०१ श्री अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री विलास सानप मिरारोड विभाग, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी/श्री संजय हजारे, पोनि/श्री विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी/श्री प्रशांत गांगुर्डे, पो.ना.विश्वनाथ जरग, सचिन हुले, पो.शि.हनुमंत तेरवे, समीर यादव, सुधीर खोत, अनिल नागरे, सनी सुर्यवशी सर्व नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.

-------oooo---------